**तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ८८/२०२४**
**निशाणी क्र. १९**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण** **सरकारी अभियोक्ता**

**..वि..**

किशोर लक्ष्मण इंगळे + ३ **आरोपी.**

| | |
|---|---|
| शासन तर्फे साक्षीदार क्र. ३ | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | गणेश कृष्णा वनारे |
| वय अंदाजे ४३ वर्षे | धंदा– नौकरी, पोलीस निरिक्षक, पो.स्टे डुग्गीपार, जि. गोंदिया. |
| राहणार | सडक अर्जुनी, जि. गोंदिया |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी स्थानीक गुन्हे शाखा, यवतमाळ येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो.

२. दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मौजा किन्ही येथे "शासन आपल्या दारी "या सभेकरीता माननीय मुख्यमंत्री हे येणार असल्यामुळे त्याठिकाणी माझा व माइया कर्मचा–यांचा बंदोबस्त पोलीस अधिक्षकांच्या आदेशान्वये लावण्यात आला होता. त्याठिकाणी गर्दीवर नियंत्रण ठेवण्याकरीता व कोणी सभेत गोंधळ घातल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता आमची ड्युटी तेथे लावण्यात आली होती. ड्युटी करत असतांना, दुपारी ३.४५ वाजता मुख्यमंत्री घटनास्थळावर आले. कार्यक्रम सुरु असतांना अंदाजे ४.१५ वाजता चार इसम सभा मंडपामध्ये घोषणबाजी करतांना आढळून आल्याने आम्ही त्याठिकाणी गेलो.

**(मध्यांनाची वेळ झालेली असल्यामुळे साक्षीदाराची सरतपासणी तहकूब करण्यात आली.)**

(पी.एस.इंगळे)

दिनांक - ०३/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

**<u>साक्षीदाराची सरतपासणी मध्यांतरानंतर शपथेवर सरकारी वकिलांमार्फत सुरुः</u>**

३. त्या व्यक्तींना आम्ही घोषणाबाजी करण्यास अटकाव केला असता त्या व्यक्तींना आम्हाला म्हटले की ''तुम्ही आम्हाला अडवणारे कोण, आम्ही तुम्हाला बघून घेवू''. तसेच त्या व्यक्तीनी आम्हाला धक्काबुक्की केली. त्यानंतर आम्ही त्या व्यक्तींना सभा मंडपाच्या बाहेर आणले व त्यांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे किशोर इंगळे, गजाान पाटिल, अशोक पुरी व सुरज खोब्रागडे असे सांगीतले. अशाप्रकारे आम्ही शासकीय कामकाज करीत असतांना त्या चार व्यक्तींना अडथळा निर्माण केला. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. त्या चार व्यक्ती आज न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे.

**<u>उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. पि. पि. किर्दक यांचे मार्फत सुरु –</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की कर्तव्यावर हजर राहाण्याबाबत आम्हाला ड्युटी पास देण्यात येते. दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची ड्युटी पास मी तपास अधिका–यांना दिली नाही. सामान्यतः जेव्हा एखादया व्यक्तीला स्थानबध्द केले जाते तेव्हा त्या व्यक्तीस सूचनापत्र देवून सोडले जाते. जेव्हा आम्ही एखादया व्यक्तीला स्थानबध्द करुन पोलीस स्टेशनला नेतो, तेव्हा त्याबाबत स्थानीक गुन्हे शाखा ही संबंधीत पोलीस स्टेशनला त्या व्यक्तीला आणते व त्याबाबत पोलीस स्टेशनला पत्र देण्यात येते.

**प्रश्न–** तुम्ही जेव्हा त्या चार इसमांना स्थानबध्द केले होते तेव्हा त्या चार इसमांना तुम्ही पोलीस स्टेशनला जमा केले नव्हते ?

**उत्तर–** आम्ही त्या चार इसमांना पोलीस स्टेशनच्या कर्मचा–यांकडे जमा केले होते.

५. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की आम्ही त्या चार इसमांना पोलीस स्टेशनच्या कर्मचा–यांकडे जमा केले होते. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील सभा मंडपामध्ये अंदाजे ४० ते ५० हजार लोकांची गर्दी होती. हे म्हणणे खरे नाही की त्या गर्दीचा खूप मोठा आवाज होता. हे म्हणणे खरे आहे की सभा मंडपामध्ये लाउडस्पीकर चालू

होते. हे म्हणणे खरे नाही की लाउडस्पीकरच्या आवाजामुळे कोणाचाही आवाज कोणालाही ऐकू जात नव्हता. हे म्हणणे खरे आहे की सभा मंडपामध्ये मोठया टि.व्ही. च्या स्क्रीन होत्या व त्यामध्ये भाषने दिसत होती. मुख्यमंत्र्यांचे भाषण असल्यामुळे तेथे त्यांचे भाषण रेकॉर्ड करण्याकरीता व्हीडीओ शूटिंगचे कॅमेरे सुरु होते, याबाबत मला कल्पना नव्हती. माझ्या निदर्शणास आले नाही की पोलीस खात्याचा व्हीडोओ शूटींगचा कॅमेरा सुध्दा घटनास्थळावर चित्रीकरण करीत होता. हे म्हणणे खरे आहे की गोपनिय पोलीसांचा व्हीडीओ कॅमेरा सभा मंडपामध्ये चित्रीकरण करीत होता.

६. हे म्हणणे खरे नाही की अति महत्वाच्या व्यक्तींच्या बसण्याच्या ठिकाणी माझी नेमणूक होती. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळावरील कार्यक्रम स्थळी माझी नेमणूक कथित घटनेच्यादिवशी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की घटनास्थळावरील कार्यक्रम स्थळी माझी नेमणूक कथित घटनेच्यादिवशी होती.

७. पोलीसांना मी बयान दिले होते व ते बयान पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. पोलीसांना बयान देते वेळी मी सांगीतले होते की *"त्या व्यक्तींना आम्ही घोषणाबाजी करण्यास अटकाव केला".* मात्र ही बाब माझ्या बयानात का नाही याचे कारण टंकलेखकाची चूकी असू शकते. हे म्हणणे खरे नाही की मी असे कोणतेही बयान पोलीसांना दिलेले नसल्यामुळे ही बाब माझ्या बयानामध्ये नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की *"कार्यक्रम सुरु असतांना अंदाजे ४.१५ वाजता चार इसम सभा मंडपामध्ये घोषणबाजी करतांना आढळून आल्याने आम्ही त्याठिकाणी गेलो, त्या व्यक्तींना आम्ही घोषणाबाजी करण्यास अटकाव केला असता त्या व्यक्तींनी आम्हाला म्हटले की ''तुम्ही आम्हाला अडवणारे कोण, आम्ही तुम्हाला बघून घेवू'', तसेच त्या व्यक्तीनी आम्हाला धक्काबुक्की केली,त्यानंतर आम्ही त्या व्यक्तींना सभा मंडपाच्या बाहेर आणले व त्यांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे किशोर इंगळे, गजाान पाटिल, अशोक पुरी व सुरज खोब्रागडे असे सांगीतले, अशाप्रकारे*

*आम्ही शासकीय कामकाज करीत असतांना  त्या चार व्यक्तींनी अडथळा निर्माण केला, पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते, त्या चार व्यक्ती आज न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर  आहे".*

९.  हे म्हणणे खरे नाही की मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना आरोपींनी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की *"दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मौजा किन्ही येथे "शासन आपल्या दारी "या सभेकरीता माननीय मुख्यमंत्री हे येणार असल्यामुळे त्याठिकाणी माझा व माझ्या कर्मचा-यांचा बंदोबस्त पोलीस अधिक्षकांच्या आदेशान्वये लावण्यात आला होता, त्याठिकाणी गर्दीवर नियंत्रण ठेवण्याकरीता व कोणी सभेत गोंधळ घातल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता आमची ड्युटी तेथे लावण्यात आली होती, ड्युटी करत असतांना, दुपारी ३.४५ वाजता मुख्यमंत्री घटनास्थळावर आले''.*

१०.  मी संदिप मेहत्रेला ओळखतो. मी ठाणेदार प्रकाश तुनकलवार यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की माझे संदिप मेहत्रे व प्रकाश तुनकलवार सोबत चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रकाश तुनकलवारच्या सांगण्यावरुन मी बयान दिले व आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळावर हजर राहाण्याबाबत मला पोलीस अधिक्षकांचा आदेश नव्हता.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी – काही नाही.**  **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक – ०३/०१/२०२६  अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

तसेच मोठया प्रमाणात गर्दी होणार असल्यामुळे माझी नेमणूक पोलीस अधिक्षक यांच्या आदेशाने साध्या गणवेषामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री वनारे यांच्यासोबत गर्दी देखरेख करण्याकामी करण्यात आली होती.

३. त्यादिवशी सदर सभेला १५.४५ वाजता माननीय मुख्यमंत्र्यांचे सभास्थळी आगमन झाले. सभा सुरु असतांना १६.१५ वाजताच्या सुमारास स्टेज समोरील सभा मंडपाच्या मागील बाजूस चार इसम हे उभे राहून नारेबाजी करुन गोंधळ घालत होते. आम्ही साध्या गणवेषातील पोलीस तसेच गणवेषातील पोलीस हवालदार संदिप मेहत्रे यांनी त्या चारही इसमांना ताब्यात घेवून त्यांना सभा मंडपाच्या बाहेर काढीत असतांना चारही इसम संगणमत करुन आमचे व गणवेषातील पोलीस संदिप मेहत्रे यांच्या अंगावर येवून असे म्हटले की ''तुम्ही आम्हाला पकडणारे कोण, आम्हाला सोडा, नाहीतर आम्ही तुम्हाला पाहून घेवू''. असे त्या चार व्यक्तीनी म्हणून आम्हाला धक्काबुक्की करुन आमच्यावर फौजदारीपात्र बलप्रयोग केला. सदर चारही इसमांना आम्ही सुरक्षीत स्थळी नेवून त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) किशोर इंगळे, २) गजानन पाटील, ३) अशोक पुरी आणि ४) सुरज खोब्रागडे, असे सांगीतले. त्यानंतर त्यांना सुरक्षीत स्थळी स्थानबध्द करण्यात आले. अशाप्रकारे आम्ही आमचे कायदेशिर कर्तव्य पार पाडीत असतांना आम्हाला त्या चार व्यक्तीनी अटकाव करुन, फौजदारीपात्र बलप्रयोग करुन शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केला. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आज ते चार व्यक्ती न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे.

**<u>उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. पि. पि. किर्दक यांचे मार्फत सुरु –</u>**

४. संदिप मेहत्रे हे माझे चांगले मित्र नाहीत. मात्र संदिप मेहत्रे हे पोलीस खात्यात असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की संदिप मेहत्रे हा माझा पोलीस सहकारी आहे. संदिप मेहत्रे मी अंदाजे तिन ते चार वर्षापासून ओळखतो. हे

म्हणणे खरे नाही की ड्युटी व्यतिरिक्त सुध्दा माझी संदिप मेहत्रे सोबत इतर वेळी भेट होते. हे म्हणणे खरे आहे की माझे पोलीस स्टेशन ग्रामीणमध्ये जाणे येणे असते.

५. सभामंडप किती एकराच्या परिसरामध्ये होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या सभामंडपामध्ये गर्दी होती.

**प्रश्न–** सभामंडपामध्ये लाउडस्पीकर मोठया आवाजमध्ये चालू होते ?

**उत्तर–** लाउडस्पीकर चालू होते. मोठया आवाजाबाबत मला सांगता येणार नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की सभा मंडपामध्ये जनतेचा आवाज मोठया प्रमाणात होता. हे मला माहिती नाही की घटनास्थळावर सि.सि.टि.व्ही. लावले होते. मला सांगता येणार नाही की सभामंडपामध्ये दोनशे ते तिनशे शसस्त्र पोलीस कर्मचारी हजर होते. किती कर्मचारी हजर होते हे सुध्दा मला सांगता येणार नाही. माझे शिक्षण झालेले असून मला २०० ते ३०० चा आकडा समजतो.

७. मला माहिती नाही की मुख्यमंत्री येणार असल्यामुळे घटनास्थळावर इतर खात्याचे कर्मचारी व अधिकारी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की मुख्यमंत्र्यांच्या विरोधी पक्षामध्ये असलेल्या नेत्यांना व कार्यकत्यांना आम्ही सकाळीच स्थानबध्द करतो व विरोधी पक्षाच्या नेत्यांना आम्ही कार्यक्रम स्थळी जाण्यापासून रोखतो.

८. हे म्हणणे खरे आहे की आमची जेथे ड्युटी लागते त्याबाबतची ड्युटी पास तयार करण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की जेथे आमची कर्तव्यस्थळी नियुक्ती होते, त्याची नोंद आमच्या कार्यालयाच्या रजिष्टरमध्ये घेतली जाते व ड्युटी पूर्ण झाल्यावर त्याची नोंद सुध्दा रजिष्टरमध्ये घेतली जाते. ज्या व्यक्तीना स्थानबध्द केले जाते त्याची नोंद आमच्या कार्यालयाच्या रजिष्टरला घेतल्या जाते किंवा नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की मला याबाबत माहिती नाही. हे मला सांगता येणार नाही की घडलेल्या घटनेची नोंद आम्हाला आमच्या रजिष्टरला घ्यावी लागते. घटनास्थळावर अनुचित प्रकार घडला तर त्याची माहिती नियंत्रण कक्षाला किंवा

वरिष्ठांना द्यावी लागते. या प्रकरणामधील कथित अनुचित प्रकाराबाबत मी नियंत्रण कक्षाला माहिती दिली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की सोबत वरिष्ठ अधिकारी असल्याने मी तशी माहिती दिली नाही.

९. मला सांगता येणार नाही की प्रकाश तुनकलवार व संदिप मेहत्रे हे कथित घटनास्थळावर अति महत्वाच्या व्यक्तीच्या बंदोबस्तासाठी नेमलेले होते. मला माहित नाही की सभा मंडपासमोरच अति महत्वाच्या व्यक्तीच्या बसण्याची व्यवस्था होती. मला सांगता येणार नाही की सभा मंडपापासून पुढे ५०० ते ६०० मिटर पर्यंत मंडप होता व तो संपूर्ण मंडप गर्दीने भरलेला होता. हे म्हणणे खरे आहे की सभा मंडपामध्ये कोण–कोण, कुठे–कुठे बसलेले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की सभा मंडपातील सर्व व्यक्तीना तुम्हाला ओळखता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/१०/२०23 रोजी मी घटनास्थळावर कर्तव्यावर हजर नव्हतो.

९. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की *''सभा सुरु असतांना १६.१५ वाजताच्या सुमारास स्टेज समोरील सभा मंडपाच्या मागील बाजूस चार इसम हे उभे राहून नारेबाजी करुन गोंधळ घालत होते, आम्ही साध्या गणवेषातील पोलीस तसेच गणवेषातील पोलीस हवालदार संदिप मेहत्रे यांनी त्या चारही इसमांना ताब्यात घेवून त्यांना सभा मंडपाच्या बाहेर काढीत असतांना चारही इसम संगणमत करुन आमचे व गणवेषातील पोलीस संदिप मेहत्रे यांच्या अंगावर येवून असे म्हटले की ''तुम्ही आम्हाला पकडणारे कोण, आम्हाला सोडा, नाहीतर आम्ही तुम्हाला पाहून घेवू'', असे त्या चार व्यक्तीनी म्हणून आम्हाला धक्काबुक्की करुन आमच्यावर फौजदारीपात्र बलप्रयोग केला, सदर चारही इसमांना आम्ही सुरक्षीत स्थळी नेवून त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) किशोर इंगळे, २) गजानन पाटील, ३) अशोक पुरी आणि ४) सुरज खोब्रागडे, असे सांगीतले, त्यानंतर त्यांना सुरक्षीत स्थळी स्थानबध्द करण्यात आले, अशाप्रकारे आम्ही आमचे कायदेशिर कर्तव्य पार पाडीत असतांना आम्हाला त्या चार व्यक्तीनी अटकाव करुन,*

*फौजदारीपात्र बलप्रयोग करुन शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केला, पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते, आज ते चार व्यक्ती न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे. ''*

१०. माझी दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची ड्युटी पास या प्रकरणाच्या तपासादरम्यान मी तपास अधिका–यांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजी कर्तव्यावर हजर नसल्यामुळे मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची ड्युटी पास या प्रकरणाच्या तपासादरम्यान मी तपास अधिका–यांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजी कर्तव्यावर हजर नसल्यामुळे मी दिनांक ३०/१०/२०२३ रोजीची कथित घटना नियंत्रण कक्षाला सांगीतली नाही.

११. मला तपास अधिका–यांनी ओळख परेड करीता बोलवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की प्रकाश तुनकलवार व संदिप मेहत्रेच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज पहिल्यावेळेस आरोपींना न्यायालयात पाहत आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की मला माझ्या वरिष्ठांचा कोणताही आदेश नव्हता. हे म्हणणे खरेनाही की आरोपींची नावे मला संदिप मेहत्रे कार्यरत असलेल्या यवतमाळ ग्रामीण पोलीस स्टेशनमधून माहिती पडली. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी – काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक – ०३/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.